# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

## दिनांक २८.०६.२०२६ रविवार

**(कामगिरी)**

**१) लकडगंज पोलीसांची कामगिरी :— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २७.०६.२०२६ चे १८.०२ वा. चे सुमारास, लकडगंज पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत गंगा जमुना परिसरात पेट्रोलींग करीत असता, भास्कर बिल्डींगचे मागे संशयास्पद दिसून आल्याने त्यास हटकले असता, तो पोलीसांना पाहुन पळू लागला. त्याचा पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव निखील राजेश नंदेश्वर वय २० वर्षे रा. बारसे नगर, अरूण पाटील यांचे घराजवळ, पाचपावली, नागपूर असे सांगीतले. आरोपीची अंगझडती घेतली असता, त्याचे कंबरेत पॅन्टचे आंत एक फोल्डींगचा लोखंडी चाकू किंमती २००/— रू. चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने लोखंडी चाकू बाळगतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे लकडगंज येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती विनीता साहू, अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रभाग, मा. श्री राहुल मदने, पोलीस उपआयुक्त, परि.क्र. ३, मा. श्री शिवप्रसाद पारवे, सपोआ. लकडगंज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. मुकुंद कवाडे, सपोनि. अजहर शेख, पोउपनि. सागर शिंदे, पोहवा. उमाकांत नागदेवे, पोअं. आशिष बांते, देवेंन्द्र सेलोकर, ईश्वरदास व चंद्रकांत यांनी केली.

**२) जरीपटका पोलीसांची कामगिरी :— घरफोडी व वाहनचोरी असे ०२ गुन्हे उघडकीस.**

फिर्यादी यश सिध्दार्थ गजभिये वय ३० वर्षे रा. प्लॉट क्र. ९४, आराधना कॉलनी, नारा रोड, जरीपटका, नागपूर यांचे पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत कडबी चौक, सदोदय अपार्टमेंट येथे शॉप क्र. १०८ मध्ये जुने व नवीन मोबाईल विक्रीचे दुकान आहे. दिनांक २५.०६.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक २६.०६.२०२६ चे ०८.३० वा. चे दरम्यान, फिर्यादी हे त्यांचे मोबाईल शॉपला कुलूप लावून बंद करून आपले घरी गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे दुकानाचे शटरचे कुलूप तोडुन व शटर उचकवून, दुकानात प्रवेश करुन, दुकानात ठेवलेले वेगवेगळया कंपनीचे जुने व नवीन असे एकूण ३३ मोबाईल फोन किंमती अंदाजे ७,००,०००/— रू. चा मुद्देमाल चोरून नेला. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जरीपटका येथे अज्ञात आरोपींविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल गुन्हा नोंदविला होता.

गुन्हयाचे तपासादरम्यान जरीपटका पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करुन आरोपींना निष्पन्न केले. त्यांनी खात्रीशीर माहितीवरुन, लेंडी मैदान, जरीपटका येथे सापळा रचुन

एका विधीसंघर्षग्रस्त बालकास ताब्यात घेतले. त्यास गुन्हयासंबंधाने विचारपुस केली असता, त्याने त्याचा साथीदार पाहिजे आरोपी नामे ऋषभ कावरे वय २४ वर्ष रा. लेंडी मैदान जवळ, जरीपटका, नागपूर याचेसह संगणमताने सोनेगाव हद्यीतून एक ॲक्टिवा ४ जी मोपेड चोरी करुन, त्याद्वारे वर नमुद दुकान फोडल्याचे कबुल केले. विधीसंघर्षग्रस्त बालकाकडून गुन्हयात वापरलेली तथा पोलीस ठाणे सोनेगांव हद्दीतुन चोरी केलेली ॲक्टिवा मोपेड विना नंबरची तसेच, वेगवेगळया कंपनीचे एकूण १३ मोबाईल फोन असा एकूण ४,४५,०००/— रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. विधीसंघर्षग्रस्त बालकाकडून वर नमुद गुन्ह्याव्यतीरिक्त पोलीस ठाणे सोनेगांव हद्दीत एक वाहनचोरी असे ०२ गुन्हे उघडकीस आणले आहेत. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती विनीता साहू, अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रभाग, मा. श्री. संदीप पखाले, पोलीस उपआयुक्त, परि.क्र. ६, मा. श्री. सत्यवान बंडीवान, सपोआ, जरीपटका विभाग यांचे मार्गदर्शनात, वपोनि. अरुण ताकतांडे, सपोनि. आशिष मोरखडे, पोहवा. रमेश यादव, मपोहवा. मिना मस्के, पोअं. मंगेश दोनाडकर, पंकज वरकड, राकेश सिंग व नितेश नागपुरे यांनी केली.



**(गुन्हे)**

**<u>पोलीस ठाणे एम.आय.डी.सी. :— जिवे ठार मारणाऱ्या आरोपीविरुध्द गुन्हा दाखल.</u>**

फिर्यादी यांचा लहान भाऊ नामे जितेंद्र उर्फ पप्पू बारेलाल तांडेकर, वय ३६ वर्ष रा. छत्तीसगडी देवांगनचे घरी किरायाने, अमर नगर, हिंगणा रोड, नागपूर हा हमाली तथा वाहन चालक म्हणून काम करायचा. दिनांक २७.०६.२०२६ चे १९.०० वा. ते दिनांक २८.०६.२०२६ चे ०७.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे एमआयडीसी हद्यीत हिंगणा रोडवरील झोन चौक, ठाकरेजी टी शॉपचे काऊंटर मागे फिर्यादीचे भावास कोणीतरी अज्ञात इसमाने कोणत्यातरी अज्ञात कारणावरुन लाकडी ठोकळा व विटेने डोक्यावर व कपाळावर मारुन जिवानिशी ठार केले. मृतदेह उत्तरीय तपासणीकरीता एम्स हॉस्पिटल येथे पाठविण्यात आला आहे.

याप्रकरणी फिर्यादी दिनेश बारेलाल तांडेकर वय ४० वर्ष रा. ब्रिजेश मोर्य यांचे घरी किरायाने, राजीव नगर, एम.आय.डी.सी. नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे पोउपनि. गजानन काठेवाडे ७९७२३४८८३९ यांनी आरोपीविरूध्द कलम १०३(१) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरु आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे बेलतरोडी</u> :—** दिनांक २८.०६.२०२६ चे ०८.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीत प्लॉट क्र. ५१, श्रुती को—ऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटी, चिचभवन, वर्धा रोड, नागपूर येथे राहणारे रत्नाकर

बालकृष्ण पांडे वय ५९ वर्ष हे आपले राहते घराचे तिसरे माळयावर लोखंडी शिडीवर उभे राहूल ग्रिलला पेंट करीत असतांना, त्यांचा तोल जाऊन ते डोक्याचे भारावर अंगणात खाली पडल्याने त्यांचे डोक्याला, छातीला व पायाला मार लागून गंभीर जखमी झाले. त्यांना उपचाराकरीता शुअरटेक हॉस्पीटल व तेथून न्युरॉन हॉस्पिटल व तेथून मेडीकल हॉस्पिटल येथे दाखल केले असता, उपचारादरम्यान दिनांक २८.०६.२६ चे ११.५८ वा. डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

यापक्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे मपोउपनि. सुकन्या चौधरी यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उपनिरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**